RNI MAHMAR
36829-2010

ISSN- 2229-4929


Peer Reviewed

# Akshar Wangmay

## International Research Journal

UGC-CARE LISTED

**Special Issue - V**
**Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation**



January 2021








**Chief Editor : Dr. Nanasaheb Suryawanshi**

**Executive Editor : Prof. Kartik R. Patil**

**Principal,**
Rashtrasant Tukdoji College, Chimur
Ta-Chimur, Dist-Chandrapur (Maharashtra)

**Co-Editor : P. M. Rajurwade**

| | | |
|---|---|---|
| 46 | कोरोना आणि मानवी जीवन शैली<br>**डॉ. माया बी. मसराम** | 164. |
| 47 | साहित्य आणि Covid-19 सद्यस्थिती<br>**डॉ. दीपक गायकवाड** | 167. |
| 48 | कोरोना महामारी आणि ऑनलाईन शिक्षणातील सकारात्मक पैलू<br>**प्रा. गजानन रामजी घुमडे** | 170- |
| 49 | भारत- आसियान संबंधावरकोरोना- 19 महामारी चा परिणाम एक अभ्यास<br>**डॉ. अशोक रामसिंग वसावे** | 173- |
| 50 | कोव्हीड - 19 या महामारीमुळे नौकरी करणाऱ्या विवाहित स्त्रियांवर झालेला शारीरिक व मानसिक परिणाम.<br>**प्रा. अनिल रा. गावंडे, प्रा. डॉ. श्याम एस. खंडारे** | 176- |
| 51 | वेळापूर येथील अर्धनारी नटेश्वर : यात्रा उत्सवाचा चिकित्सक अभ्यास<br>**प्रा. डॉ. शिवाजी मारुती वाघमोडे, श्री. तेलसंग हनमंत भिमराव** | 178- |
| 52 | कोविड १९ च्या दुष्परिणामामुळे महिला हिंसाचारात झालेल्या वृध्दीचे अध्ययन<br>**डॉ. विजया एच. राऊत** | 180- |
| 53 | कोविड -१९ आणि राजकीय संस्थांसमोरील आव्हाने<br>**डॉ. प्रभाकर रघुनाथ जगताप** | 184- |
| 54 | संगमनेर शहरातील माध्यमिक स्तरावरील विज्ञान विषयाची प्रात्यक्षिके व त्यांच्या परीक्षा संदर्भातील वस्तुस्थितीचा चिकित्सक अभ्यास करणे<br>**सौ लोंढे एस .आर.** | 187- |
| 55 | चेंबूर परिसरामधील विद्यार्थ्यांच्या रासायनिक अभिक्रिया लेखनात होणाऱ्या चुका व त्या संदर्भातील कारणांचा चिकित्सक अभ्यास करणे.<br>**सौ लोंढे एस. आर.** | 191- |

'Akshar Wangmay' UGC Care Listed, International Research Journal, ISSN: 2229-4929, January 2021
Special Issue, Volume V "Interdisciplinary View on Socio-Economic, Educational, Management, Environmental, Research, Language and Sustainable Development in Covid-19 Pandemic Situation"

# साहित्य आणि Covid-19 सद्यस्थिती

डॉ. दीपक गायकवाड
श्री शाहू मंदिर महाविद्यालय पर्वती, पुणे

**सारांश-**
संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होणे ही बाब मानवी इतिहासात नवीन नाही. पाठीमागचा एक हजार वर्षांपूर्वीचा इतिहास पाहिला तर प्रत्येक शतकात कोणत्या ना कोणत्या साथीचा आजार येऊन गेलेला दिसतो. एकोणिसाव्या शतकाच्या अगोदर डिजिटल मीडिया नव्हता त्यामुळे कोणत्या भागात साथीचा आजार जास्त व कमी आहे हे पटकन कळायला तयार नव्हते परंतु या एकविसाव्या शतकात संगणक युगामुळे व नवीन तंत्रज्ञानामुळे अशा प्रकारचा साथीचा रोग उद्भवला तर एका सेकंदात सर्व जगात माहिती मिळते व कळते. सध्याच्या कोराणाचे चे उदाहरण आपल्या सर्वांसमोर आहे. साहित्य आणि सामाजिक परिस्थिती यांचा घनिष्ठ संबंध आहे. त्यामुळे covid-19 चा प्रभाव साहित्यनिर्मिती, लेखन व वाचन यावर पडलेला दिसतो.

**प्रास्ताविक-**

भारतातील प्राचीन ग्रंथांमध्ये साथीच्या रोगाचा उल्लेख पहायला मिळतो. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी या ग्रंथात, तुकारामांनी आपल्या अभंग गाथेत साथीच्या रोगाचा उल्लेख केलेला पाहायला मिळतो परंतु एकविसाव्या शतकाच्या अगोदर ज्या साथी आल्या त्याचा उल्लेख देवाच्या कोपाशी जोडलेला दिसतो. वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या आभावामुळे अंधश्रद्धेचा तो भाग मानला जात असे परंतु तुकाराम सारख्या विद्रोही कवीने अशा प्रकारच्या साथीच्या रोगाचे वस्तुनिष्ठ वर्णन केले. तो अंधश्रद्धेचा भाग नाही हे ठणकावून सांगितले. मागील काही वर्षांमध्ये आलेल्या या साथीचा प्रभाव ग्रंथनिर्मितीवर व साहित्यावर पडलेला दिसत नाही. पण अलीकडच्या डिजिटल तंत्रज्ञानामुळे, विज्ञानाच्या वाढत्या प्रगतीमुळे, वाढलेल्या लोकसंख्येमुळे शासनाच्या काटेकोर नियामांमुळे covid-19 चा प्रभाव साहित्यावर पडलेला दिसतो.

**स[illegible]य कोविड-१९-**

साहित्याची सामाजिक बांधिलकी ही खोलवर असते. अगदी समाजातील तळागाळातील वास्तव चित्रण त्या त्या काळात अटलेले दिसते. covid-19 चा प्रादुर्भाव वाढल्यानंतर लॉकडाऊनच्या काळात समाजाची अस्थिरता व लॉकडाऊन हळूहळू उठल्यानंतर बदललेली परिस्थिती याचे चित्र मुकेश माचकर यांच्या 'कोरोणा कथा' मध्ये पहायला मिळते. 'राजा को राणी से प्यार हो गया' या कथेत ते म्हणतात, "तिचं नाव राणी नव्हतं, त्याचंही नाव राजा नव्हतं. लॉकडाऊन उठवला जाऊ लागला, त्याकाळात त्यांची पहिली भेट झाली होती. मुंबईच्या एका उपनगरातल्या रेल्वे स्टेशनवरच्या पूर्व आणि पश्चिम बाजूला जोडणाऱ्या पादचारी पुलावर. दोन्ही डोळ्यात फुलं, पडलेली स्क्रू थोडा ढिला असलेली गलीच्छ कपड्यांमधली हडकलेली अधू डोळ्यांची भिकारीण होती ती. त्या पुलावर रोज भीक मागणारी. कोरणामुळे लॉकडाऊन लागलाय हे तिला कळलं 'तिचा पूल' दोन्ही बाजूंनी आडसर लावून बंद करण्यात आला तेव्हा. ती रोज पुलापाशी यायची. अडसर चाचपायची आणि हे कृत्य करणाऱ्यांना शिव्याशाप देत उपनगराच्या अंधार्या सांदीकोपर्यारत परतायची."१

या कथेची सुरुवात आणि हा मजकूर बघितल्यानंतर कोरोणाचा प्रभाव कथेमध्ये तळागाळापर्यंत कसा पोहोचला आहे हे आपल्याला पहायला मिळते. Covid-19 मुळे पूर्ण जगासमोर फार मोठे संकट उभे राहिले आहे राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक क्षेत्रात यामुळे परिवर्तन होताना दिसत आहे. शिक्षण व साहित्य क्षेत्राला याचा फार मोठा फटका बसला आहे. शालेय शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत या साथीच्या आजारांमुळे प्रचंड आव्हाने निर्माण झाली आहेत. त्यामुळे ऑनलाईन शिक्षण ही एक नवीन संकल्पना उदयास आली आहे.

C[illegible]-19 मुळे उद्भवलेल्या परस्थितीत विद्यार्थी-शिक्षक वाचक हे साहित्यापासून दुरवलेला दिसत आहे. आजही पुस्तके विद्यार्थ्यांना उपलब्ध झालेली नाहीत. पुस्तक निर्मिती प्रक्रिया व प्रकाशन प्रक्रिया मंदावली आहे. covid-19 नंतर विद्यार्थ्यांना संशोधनाविषयी मार्गदर्शन करून त्याकडे त्यांची मने वळवली पाहिजेत यासाठी काही अनुदानाची तरतूद शासनाने केली पाहिजे. विद्यार्थी शिक्षक आणि सरकार यांच्यामधला समन्वय महत्त्वाचा आहे विद्यापीठातील अभ्यासक्रममध्ये उद्योजकीय परिसंवाद परिसंस्था तयार केल्या पाहिजेत.विद्यार्थी व शिक्षकांनाही हे महत्त्वाचे ठरेल.

covid-19 नंतर साहित्याचा आणि इतर शास्त्रांचा असणारा संबंध विद्यार्थ्यांसमोर आणला पाहिजे साहित्य आणि विज्ञान, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, आरोग्य शास्त्र इत्यादी शास्त्रांचा नवीन अभ्यास साहित्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकवला

पाहिजे. साहित्य हा समाजाचा आरसा आहे असे आपण म्हणतो. प्रत्येक दशकांमध्ये आर्थिक, सामाजिक व धार्मिक, राजकीय परिस्थितीचे प्रतिबिंब साहित्यात सहाजिकच होते. अशा प्रत्येक शतकात साथीच्या रोगाचा मुकाबला करण्यासाठी साहित्याने फार मोठी मदत केली आहे. साहित्याचे सामर्थ्य येथे दिसून येते. साथीच्या काळात एकजुटीने काम करण्यास व मानसिक स्थिती चांगली ठेवण्यास मानवाला साहित्य मदत करते. साथीच्या रोगात विकृत प्रवृत्तीच्या माणसाच्या विचाराला योग्य दिशा देण्याचे काम साहित्य करते. या सर्व मनोवृत्तीचे दर्शन साहित्यात घडते. आणि म्हणून कोरोणाच्या काळात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी अवघ्या मानव जातीला साहित्याची गरज आहे. ती गरज आजपर्यंत साहित्याने भरून काढली आहे. रवींद्रनाथ टागोर यांच्या 'पुरातन नृत्य' या कवितेत साथीच्या आजाराचे वर्णन आले आहे. अहमद अली यांच्या दिल्लीतील 'खापलाईल' या कादंबरीत साथीच्या रोगाचा उल्लेख सापडतो. हिंदी कवी सूर्यकांत त्रिपाठी यांच्या साहित्यात साथीच्या रोगाचे वर्णन आढळते साहित्याचे समाजावर व समाजाचे साहित्यावर नेहमीच बरेवाईट परिणाम होत असतात. लेखक-वाचक व भाषा यामुळे एक सामाजिक परिणाम तयार होते. समाजाच्या वाटचालीत निर्माण होणाऱ्या प्रत्येक युगाचे स्वतःचे असे एक खास धोरण वा सूत्र असते. ते त्या काळात निर्माण होणाऱ्या साहित्यात प्रतिबिंबित होत जाते. कोरोणाच्या बाबतीत हे खरं ठरणार आहे, ठरत आहे. महाराष्ट्राच्या मध्यकुीन वाटचालीत अध्यात्म हे अशा प्रकारचे सूत्र होते. इंग्रजी कालखंडात १८७४ नंतर सर्वांगीण प्रबोधनाचे सूत्र निर्माण झाले. साहित्य निर्मिती ही त्या व्यक्ती मनातून निर्माण होते. त्या व्यक्ती मनाचे स्वरुप समाजातील घडामोडींवर अवलंबून असते आणि म्हणून मागील एक वर्षाच्या कालखंडातील सामाजिक परिस्थितीचे चित्रण साहित्यातून नक्कीच उमटताना दिसत आहे. मराठी साहित्यामध्ये हे भगवद्गीता, ज्ञानेश्वरी, विवेकसिंधू, तुकारामगाथा, रामायण-महाभारत, एकनाथांची भारुडे, ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य इत्यादी वांग्मय मोलाचे दगड आहेत. प्राचीन व मध्ययुगीन कालखंडानंतर आजच्या आधुनिक कालखंडात आत्मचरित्र, कविता, कथा-कादंबऱ्या यातून चित्रित झालेले जग हे माणसाला शहाणपण शिकवणारे आहे, हे वैश्विक साहित्य आहे, ते कोणत्याही भाषेतील असू द्या तेथील समाजाला व राष्ट्र निर्मितीला तभार लावणारे आहे. कोरोणाच्या काळात महाराष्ट्रातून व भारतातून या साहित्याचा जगण्यासाठी फार मोठा उपयोग झालेला दिसतो. जगामध्ये ज्या संस्कृती महान आहेत, प्रगत आहेत त्याचा अभ्यास केला असता वा इतिहास पाहिला असता एक गोष्ट लक्षात येते की, ज्या समाजामध्ये राष्ट्रांमध्ये साहित्याचा अभ्यास चिंतन मनन मोठ्या प्रमाणावर झाले आहे, होत आहे तो समाज व राष्ट्र प्रगत व प्रगतिपथावर असतो. साहित्याचा अभ्यास केलेला एखादा व्यक्ती मानसिक व आध्यात्मिक दृष्टीने प्रगत असतो व तो योग्य विचार करू शकतो. त्याचे व्यक्तिमत्त्व व त्याच्या विकासाची जी प्रगती होते त्यामध्ये साहित्याचा मोलाचा वाटा असतो हे नाकारून चालणार नाही. कोरोणाच्या काळात साहित्याने जगाला तारले असे म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

कोरोणाच्या काळात ग्रंथालये बंद होती. ग्रंथालय सुरू करणे हे एक आव्हान होते अजूनही पहिल्यासारखे सक्षमपणे ग्रंथालये सुरू नाहीत. वाचक पहिल्यासारखे ग्रंथालयात जात नाहीत. लॉकडाउनच्या काळात मुद्रण व्यवसाय संकटात आला आहे. या काळात पुस्तके प्रदर्शने बंद होती. नोटाबंदी नंतर साहित्य व्यवहाराचे कंबरडे मोडले आहे. यापुढील काळात सामूहिक प्रकाशनाचा पर्याय पुढे येऊ शकतो. आधीच वाचन संस्कृतीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालेले असताना कोरोणामुळे 'दुष्काळात तेरावा महिना' अशी परिस्थिती साहित्यविश्वात झाली आहे. पुस्तके अत्यावश्यक सेवांमध्ये मोडत नसल्याने लॉकडाऊनचा मोठा फटका प्रकाशनाला व प्रकाशकांना बसला. लॉकडाऊन शिथिल झाल्यानंतर काही ठिकाणी पुस्तकांची दुकाने सुरू झाली असली तरी वाचत दुकानापर्यंत यायला तयार नाही. ही सद्यस्थिती आहे. सध्या झालेले नुकसान भरून काढण्यास, भविष्यात भरून काढावयाचे असल्यास प्रकाशकांना एका छताखाली एकत्र यावे लागणार आहे. यापूर्वीही काही प्रकाशकांनी एकत्र येऊन पुस्तक प्रदर्शन एक परिसंवाद असे विविध उपक्रम राबवण्याचा प्रयत्न केला होता. याबाबत संजय भास्कर जोशी म्हणतात, "प्रकाशकांना ढील काळात अचूक डेटा कलेक्शन ची सवय लावून घ्यावी लागेल प्रकाशक वितरकांनी एकत्र येऊन मार्केटिंगची नवे पर्याय तपासून पाहिले पाहिजेत. वाचकांची अभिरुची कशा पद्धतीने बदलत आहे याचा बारकाईने अभ्यास करावा लागेल. वाचक सर्वंकष साहित्याची नोंद घेत असल्याने ग्रंथ व्यवसायात स्पर्धा करण्यात अर्थ नाही. कोरोणाकाळात ई-बुक ऑडिओ बुक चे प्रमाण वाढले आहे."२

मराठीमध्ये पुस्तके ऑनलाइन प्रकाशनाचा प्रयोग ही या काळात झाला. म्हणजे ई- बुकचा पर्याय वाचकांना देण्यात आला पारंपरिक पद्धतीनेही छपाई न करता पुस्तक थेट ऑनलाईन प्रकाशित करण्यात आले. हा मराठीतील पहिलाच प्रयोग म्हणावा लागेल. याबाबत रोहन चंपारणकर म्हणतात, "कोरोना टाळेबंदीतही साहित्य व्यवहार सुरू राहावा यासाठी आम्ही प्रयत्नशील आहे, नव्या तंत्रज्ञानाचा साहित्य व्यवहारासाठी वापर व्हावा अशी सुरुवातीपासूनची भूमिका आहे."३

Covid-19 व साहित्याच्या संबंधी असलेली ही दुसरी बाजू ही तेवढीच महत्त्वाची आहे. शेखर देशमुख म्हणतात, 'जग थांबतं तेव्हा' या पुस्तकाबद्दल म्हणतात, "कोरोणामुळे लागलेल्या लॉकडाउन काळात जसं आत्ममग्न समाजाचं दर्शन घडलं, तसंच बेवारस कामगार वर्गाचं बेदखल जगनही जगापुढे आलं. या दोन टोकाच्या अवस्थांमध्ये पुढे सरकत गेलेल्या समाजाने काय साधलं, काय गमावलं याचं भान देणार 'जग थांबतं तेव्हा' हे गौरी कानेटकर यांचं पुस्तक नुकतच समकालीन प्रकाशनातर्फे प्रकाशित झालं आहे."

कोरोणाच्या पार्श्वभूमीवर माणसाच्या संवेदनांचा परीघ कसा ठरतो. संवेदनशीलतेच्या व्याप्ती आणि खोलीवर कोणाचं नियंत्रण असते हे प्रश्न महत्त्वाचे ठरले आहेत. आता आजच्या साहित्याचे ते विषय बनू पाहात आहेत. उद्याचे साहित्यात ते दिसतील.

**निष्कर्ष-**

१.Covid-19 हे मध्यवर्ती सूत्र येणाऱ्या काळात कथा कादंबरीत जास्त प्रमाणात पाहायला मिळू शकते व त्यामुळे समाजाच्या प्रश्नाचे केलेले विश्लेषण हे वाचकांच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरल.

२.Covid-19 च्या काळात मराठी अभिजात साहित्याने एक मानसिक आधार वाचकांना दिला.

३.कोरोणामुळे आत्ममग्न समाजाचे दर्शन घडले त्याचे प्रतिबिंब या काळातील साहित्यात उमटलेले दिसते.

४.ग्रंथ छपाईपेक्षा Covid-19 मुळे **e-book** चा पर्याय वाचकांसमोर आला आहे.

५.प्रकाशन आणि मुद्रण व्यवसायाला **covid-19** मुळे मंदी आलेली दिसते.

६.साहित्यनिर्मिती वर कोरोणाचा प्रभाव काही प्रमाणात पडलेला दिसून येतो.

**संदर्भ व टीपा-**

१.मांचकर मुकेश, 'महाअनुभाव', ऑक्टोबर २०२०, युनिक फीचर्स, पृष्ठ क्र. १०

२.दैनिक लोकमत पुणे, ऑक्टोबर २०२०, पृष्ठ क्र. ९

३.देशमुख शेखर, 'महाअनुभव' ऑक्टोबर २०२०, पृष्ठ. क्र.६६

४.कानेटकर गौरी, 'जग थांबतं तेव्हा', समकालीन प्रकाशन, पुणे